महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

कृषीपंपासाठी वापरल्या जाण्याऱ्या वीज युनिटच्या अहवालाबाबत

(१) ५६२० (१६-०४-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री-.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषीपंपासाठी सन २०१८-१९ मध्ये ३२ हजार ५०० दशलक्ष युनिट वीज वापरल्याचा दावा महावितरणने केला असताना प्रत्यक्षात त्यापेक्षा सुमारे १० हजार दशलक्ष युनिट कमी म्हणजेच २२ हजार ८५० दशलक्ष युनिट वीज राज्यातील कृषीपंपानी वापरल्याचा अहवाल तज्ञांच्या अभ्यासगटाने माहे जाने,२०२० मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजहानी लपविण्यासाठी महवितरण कंपनी कृषीपंपाच्या नावावर भरमसाठ वीज वापर दाखवून सामान्य वीज ग्राहकांवर त्याचा बोजा लादण्यात आला आहे असा आरोप राज्यातील वीज ग्राहकांनी तसेच राज्य वीज ग्राहक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ५ वर्षापूर्वीच केला होता, हेही खरे आहे काय,

(३)असल्यास, या दरम्यानच्या काळात याप्रकरणी राज्य नियामक आयोगाने तज्ञांचा अभ्यासगट नेमला असता सदर अभ्यास गटाने सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार महा.राज्य वीज वितरण कंपनीने वीज चोरी लपवून तो वीज वापर कृषीपंप धारकांच्या नावावर दाखविण्यात आल्याचे स्पष्ट झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)तसेच खोटया आकडेवारीच्या आधारे वीज ग्राहकांकडून वसुल केलेले ४ हजार कोटी रुपये ग्राहकांना परत करावेत अशी वीज तज्ञांनी केलेल्या मागणी प्रकरणी देखील शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(६)नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. नितीन राऊत (२१-०५-२०२२) : (१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने स्थापन केलेल्या अभ्यास गटाने त्यांचा अहवाल दिनांक १२ मार्च, २०२० रोजी सादर केला असून त्यात सन २०१८-१९ साठी लघुदाब कृषी ग्राहकांचा वीज वापर हा २३५०० दशलक्ष युनिटच्या (+/-) ४ टक्क्यांदरम्यान असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही. शेतीसाठी विजेच्या वापराचे अंदाज हे कृषी ग्राहकांच्या मीटरवर नोंदलेल्या वापराच्या आधारावर काढण्यात आले होते, ते स्वयंचलित मीटर वाचन पध्दतीने काढण्यात आले नव्हते. अभ्यास गटाने फिडर्सवरील माहितीचा (डेटा) वापर केला, ज्याचे विश्लेषण सांख्यिकी साधनांद्वारे करण्यात आले आहे.

(३) अभ्यास गटाच्या अहवालात महावितरण कंपनीची सन २०१८-१९ साठीची वितरण हानी १४.७ टक्के नसून २२ टक्के असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) अभ्यास गटाने आपल्या अहवालात हे नमूद केले आहे की, कृषी वीज वापर जास्त दाखविल्याने महावितरण कंपनीस कोणताही फायदा झालेला नाही. शासनाकडून मिळालेल्या अनुदानाच्या रकमेमुळे सर्व ग्राहकांचे वीज दर कमी ठेवण्यात मदत झाली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर, आटपाडी व तासगाव (जि. सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळण्याबाबत

(२) १३६२२ (१५-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर, आटपाडी व तासगाव (जि. सांगली) तालुक्यातील अंदाजे दोन हजारहुन अधिक शेतकऱ्यांनी पैसे भरूनही अद्यापही त्यांना वीज जोडणी मिळाली नसल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप उक्त दोन हजारहून अधिक शेतकऱ्यांना वीज जोडणी न मिळण्याची कारणे काय आहेत.
(३) असल्यास, शेतकऱ्यांना तात्काळ वीज जोडणी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. नितीन राऊत (२१-०५-२०२२) : (१) हे खरे आहे. खानापूर, आटपाडी व तासगाव (जि.सांगली) तालुक्यात माहे जून,२०२० अखेर एकूण ३६४९ कृषीपंप अर्जदार पैसे भरून वीज जोडणीकरिता प्रलंबित आहेत.
(२) सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन वीज जोडणीसाठी प्रलंबित असलेल्या २८८३ कृषीपंप अर्जदारांपैकी २६५७ कृषीपंपाचा उच्चदाब वितरण प्रणाली योजनेच्या निकषानुसार समावेश करण्यात आला असून ९७९ वीज जोडण्या जुलै, २०२० अखेर देण्यात आल्या आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत व रु.२.५ लाख या मर्यादेत न बसणारे २२६ कृषीपंप सौर पंपाद्वारे वीज जोडणीसाठी प्रलंबित आहेत.

तसेच दिनांक ३१.०३.२०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या अर्जदारांपैकी ६६३ वीज जोडण्या विविध योजनेअंतर्गत देण्यात आल्या असून उर्वरित १४६२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.
(३) राज्यातील ३१ मार्च, २०१८ नंतर पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना वीज जोडणी देण्यासाठीचा सर्वसमावेशक “कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०” दिनांक १८.१२.२०२० रोजी जाहिर करण्यात आले आहे. त्यातील अनुज्ञेयतेनुसार वीज जोडणी देण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

किट्टी आडगाव (ता.माजलगाव, जि. बीड) येथील घरात विजेचा धक्का बसुन दोन व्यक्तिंचा झालेला मृत्यू

(३) २८९६४ (०२-०८-२०२१). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किट्टी आडगाव (ता.माजलगाव, जि. बीड) येथील पाटील गल्ली येथे शशीकलाबाई शंकरराव फपाळ (६५) व त्यांची मुलगी सखुबाई शेषराव फपाळ (४५) या दोघींचा घरात विदयुतप्रवाह उतरून खोलीत आग लागल्याने दि. २३ मे, २०२१ रोजी होरपळून मृत्यू झाला, असल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. नितीन राऊत (२१-०३-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
मौजे किट्टी आडगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड येथील पाटील गल्ली येथील श्रीमती शशिकलाबाई शंकरराव फपाळ याचे घरी झालेल्या अपघातासंदर्भात चौकशी केली असून त्यात असे निर्दशनास आले आहे की, श्रीमती शशिकलाबाई शंकरराव फपाळ व श्रीमती सखुबाई फपाळ हया अपघातग्रस्त त्यांच्या घरात अनधिकृतपणे विजेचा वापर करीत होते. सदरील ठिकाणी महावितरणतर्फे अधिकृत वीज जोडणी घेण्यात आलेली नव्हती. घरांमध्ये स्वंयपाकासाठी सदोष इलेक्ट्रीक शेगडीचा असुरक्षित वापर करत असताना ज्वलनशील पदार्थाच्या संपर्कात आल्याने आग लागली. त्यामुळे वीजेचा धक्का लागून व होरपळून मृत्यू झाला असून सदरील घटनेस महावितरण जबाबदार नसून, त्यांस अपघातग्रस्त स्वत: जबाबदार असल्याबाबतचा अभिप्राय विद्युत निरीक्षक, बीड या कार्यालयामार्फत सादर झाला आहे.
(३) प्रश्न उद्धवत नाही.

मौ.हातनी (ता.लोहा जि.नांदेड) येथे उच्च दाब वितरण प्रणाली योजनेतंर्गत प्रस्तावित असलेले ३३ केव्ही २२० केव्ही सबस्टेशन चे काम सुरु करण्याबाबत

(४) ३२२२७ (१०-०८-२०२१). श्री.श्यामसुंदर शिंदे (लोहा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.हातनी (ता.लोहा जि.नांदेड) येथे वितरण प्रणाली योजनेतंर्गत प्रस्तावित असलेले ३३ केव्ही उपकेंद्राचे काम अदयाप सुरु झाले नसल्याचे नुकतेच माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामास विलंब होत असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना योग्य दाबाने वीज पुरवठा होत नसल्याने सिंचनावर विपरीत परिणाम होऊन शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१२-२०१४ दरम्यान कृषीपंप वीज जोडणीसाठी राबविण्यात आलेल्या "महावितरण आपल्या दारी" या योजनेत कोटेशन भरणा केलेले लोहा तालुक्यातून १६०० अर्जदार व कंधार तालुक्यातून ८०० अर्जदार आजपर्यंत विद
विद्युत खांब उभारणी व कायमस्वरुपी वीज जोडणीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, लोहा (ता.लोहा, जि.नांदेड) येथे २२० केव्ही सबस्टेशन मंजूर असूनही अद्यापी सदरहू सबस्टेशनचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौ.हातनी (ता.लोहा जि.नांदेड) येथे उच्च दाब वितरणप्रणाली योजनेतंर्गत प्रस्तावित असलेले ३३ केव्ही उपकेंद्राचे व २२० केव्ही सबस्टेशन चे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नितीन राऊत (२१-०५-२०२२) : (१) हे खरे आहे. मौ. हातनी ता. लोहा, जि. नांदेड येथे नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारणीसाठी प्रकल्प अहवाल महावितरण सांघिक कार्यालय मुंबई येथे प्राप्त झाला होता. परंतु, सदर उपकेंद्र तांत्रिक अर्हतेमध्ये बसत नसल्याने उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले नाही.
(२) हे खरे नाही. सदर ठिकाणी दिनांक १०.०८.२०२१ रोजी जोड वाहिनीचे काम पुर्ण करुन अतिभारीत झालेल्या ११ के.व्ही. मारतळा वाहिनीचा भार लगतच्या ३३ के.व्ही. हळदा उपकेंद्रावरती वळता करण्यात आला आहे. त्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी झाले आहे.
(३) हे अंशत: खरे आहे. कंधार तालुक्यात ५५७ व लोहा तालुक्यात ६४४ अर्जदार असे एकूण १२०१ कृषीपंपाला महावितरण आपल्या दारी योजनेतंर्गत कायमस्वरुपी वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. तसेच राज्यात महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत वीज जोडणी देण्यात आलेल्या ग्राहकांना वीज वाहिनी व विद्युत खांब इत्यादी पायाभूत सुविधांची कायमस्वरुपी उभारणी निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजित आहे. तसेच "कृषीपंप वीज जोडणी

धोरण-२०२०" नुसार यापूर्वी "महावितरण आपल्या दारी" योजनेअंतर्गत वीज जोडणी देण्यात आलेल्या व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसलेल्या ग्राहकांनी वीज वाहिनी व विद्युत खांब इत्यादी आवश्यक पायाभूत सुविधांची स्वखर्चाने उभारणी केल्यास सदर खर्चाचा परतावा वीज बिलातून करण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) हे अंशत: खरे आहे. २२०/३३ के.व्ही. २*५० एम.व्ही.ए. क्षमतेचे लोहा, जि. नांदेड येथे २२० के.व्ही. अतिउच्चदाब उपकेंद्र उभारण्याचा तांत्रिक प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून मुख्य कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची तांत्रिकदृष्टया सुसाध्यता व आर्थिकदृष्टया व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) मौ. हातनी ता. लोहा, जि. नांदेड येथे नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्राचा प्रस्ताव मुख्यकार्यालयास प्राप्त झाला होता. सदर उपकेंद्र तांत्रिक अहर्तेमध्ये बसत नसल्याने उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले नाही.
तसेच, लोहा, जि. नांदेड येथे २२० के.व्ही. अतिउच्चदाब उपकेंद्र उभारण्याचा तांत्रिक प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून मुख्य कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव तांत्रिकदृष्टया सुसाध्य असल्यास आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुसूचित जाती जमाती जात वैधता प्रमाणपत्राबाबत

(५) ३४२०३ (१२-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जाती जमातींच्या लोकांना जात प्रमाण पत्राची वैधता प्राप्त करतांना येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करण्यासाठी पी.व्ही.हरदास यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती विभागातील कोळी महादेव जातीच्या लोकांना अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती कडून नाकारण्यात येते हे, खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त .पी.व्ही हरदास समितीचा अभ्यास अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, तसेच अहवालात कोणते निष्कर्ष काढले,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

ॲड. के. सी. पाडवी (०८-०६-२०२२) : (१) होय
(२) हे खरे नाही. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पडताळणीसाठी प्राप्त होणाऱ्या जमाती प्रमाणपत्राची महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग अधिनियम २००० व त्यांतर्गत करण्यात आलेल्या नियमांमधील तरतूदीनुसार पडताळणी करण्यात येते. तसेच उक्त अधिनियमातील कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदाराची आहे.
(३) होय, पी.व्ही. हरदास समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालात त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणी दिलेल्या मागदर्शक सूचनांनुसार सध्या अस्तित्वात असलेली कार्यपध्दती व यंत्रणा यामध्ये कोणताही व्यत्यय आणण्याची वा पर्यायी यंत्रणा सुचविण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच सध्या वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी अस्तित्वात असलेली कार्यपध्दती ही योग्य असून भविष्यात ही कार्यपध्दती वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी चांगल्या पध्दतीने कार्यरत राहू शकते असे मत व्यक्त केले आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या समित्यांच्या कामाकाजामध्ये सुधारणा करणे , समित्यांचे बळकटीकरण करणे यासाठी काही शिफारशी केलेल्या आहेत. यापैकी समित्यांची संख्या वाढविणे, समित्यांमधील रिक्त पदे भरणे, समित्यांना आवश्यक सुविधा पुरविणे इ. १४ शिफारशी दिनांक ७ जून, २०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्य करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) येथे प्रक्रिया केलेल्या अन्न पदार्थाचे ब्रॅन्डींग करुन “क्लस्टर फॅसिलेटेशन सेल” योजना राबविण्याबाबत

(६) ३४६५२ (०७-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)शासनाने “क्लस्टर फॅसिलेटेशन सेल” ची माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घोषणा केली असून जिल्हयासाठी जिल्हाधिकारी हे त्याचे पदसिध्द अध्यक्ष आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जत (जि.सांगली) तालुक्यात डाळिंब, द्राक्ष, केशर आंबा, ड्रॅगन फ्रुट सारखी दर्जेदार फळ पिके उत्पादीत होत असून या भागातील शेतकरी अल्प शिक्षित असून मालाचे ब्रॅन्डींग झाल्याशिवाय सदर सेलचा लाभ त्यांना मिळणार नसल्यामुळे शासनस्तरावर पोकरा, अपेडा, नाबार्ड या नामांकित संस्थांकडून गावपातळीवर मार्गदर्शक उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार आहेत काय,

(३) असल्यास, जत येथे फुड प्रोसेससाठी मालाचे ब्रॅन्डींग करुन “क्लस्टर फॅसिलेटेशन सेल” योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील (१३-०६-२०२२) : (१) होय. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दि.६.९.२०२१ व दि.२२.१२.२०२१ अन्वये राज्याचे कृषि निर्यात धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली “क्लस्टरनिहाय क्लस्टर फॅसिलिटेशन सेल” गठित करण्यात आले आहेत.

(२) सांगली जिल्हयाचा समावेश कृषि निर्यात धोरणांतर्गत डाळींब, द्राक्ष व बेदाणा या क्लस्टर मध्ये आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली क्लस्टरनिहाय क्लस्टर फॅसिलिटेशन सेल यांनी संबंधित घटकांसोबत चर्चा करुन उपलब्ध साधनसंपत्तीचा अभ्यास करुन अवश्यकतेनुसार निर्यातवृध्दीकरिता आवश्यक असलेले सर्व कार्यक्रम क्लस्टर फॅसिलिटेशन सेल यांचेमार्फत करण्यात येणार आहेत. यानुषंगाने केशर आंबा, मोसंबी, हळद व फुले यांच्या क्लस्टर फॅसिलिटेशन सेलच्या बैठका संपन्न झालेल्या आहेत. तसेच संत्रा, केळी, केशर आंबा,द्राक्ष डाळिंब, फुले याकरीता निर्यातविषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. सांगली जिल्हयातून द्राक्ष व बेदाण्याच्या निर्यातवृध्दीच्या अनुषंगाने अपेडाच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दि.१९.१२.२०१९ रोजी सांगली येथे बायर-सेलर मिट उत्पादकांकरिता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच सांगली क्लस्टर मधील द्राक्ष व बेदाणा उत्पादनाकरीता दि.२१.७.२०२०, दि.१८.९.२०२० व दि.२०.५.२०२१ रोजी ऑनलाईन वेबीनारद्वारे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव अंतर्गत राज्याचे कृषि निर्यात धोरणाचे लोकार्पण व निर्यातविषयक चर्चासत्राचे आयोजन दि.२५.२.२०२२ रोजी करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी व प्रतिथयश संपन्न निर्यातदार यांनी मार्गदर्शन केले.

(४)कृषिमाल प्रक्रियेकरिता राज्यामध्ये कृषि आयुक्तालयाअंतर्गत अन्न प्रक्रिया संचालनालय स्थापन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औंढा नागनाथ (जि. हिंगोली) तालुक्यात स्वतंत्र वीजकेंद्र स्थापन करण्याबाबत..

(७) ३५२०६ (१७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये तालुकानिहाय स्वतंत्र १३२ के.व्ही.चे वीजकेंद्र उभारण्याबाबत शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींकडून अनेकदा मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्याची निर्मिती होऊन २५ वर्षे उलटूनही या तालुक्यासाठी स्वतंत्र १३२ के.व्ही. वीजकेंद्र स्थापित करण्यात आले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औंढा नागनाथ तालुक्याला कुरुंदा येथील वीज केंद्रातून लगतच्याच जवळा बाजार उपकेंद्रामधून विद्युत पुरवठा करावा लागत असणाऱ्या कुलुंदा वीज केंद्रावर ताण पडून वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याचेही निदर्शनास आले , हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी वारंवार मागणी केलेली असतांना अस्तित्वात आलेल्या औंढा नागनाथ तालुक्यात १३२ के.व्हीचे स्वतंत्र उपकेंद्र स्थापित न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास,उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन औंढा नागनाथ तालुक्यासाठी १३२ के.व्हीचे स्वतंत्र वीज केंद्र निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) औंढा नागनाथ तालुक्यात महापारेषण कंपनीचे अति उच्च दाब उपकेंद्र नाही. तथापि, १३२ के.व्ही. कुरुंदा उपकेंद्र, ता. बसमत, जि.हिंगोली येथून औंढा नागनाथ येथे वीज पुरवठा करण्यात येतो.
१३२/३३ कुरुंदा उपकेंद्रावर अधिकत्तम वीज मागणीची नोंद स्थापित क्षमतेच्या तुलनेत ६२.९% इतकी आहे. त्यामुळे कुरुंदा वीज केंद्रावर ताण पडत नाही.
(४) औंढा नागनाथ तालुक्यामधील वीज ग्राहकांना सद्यस्थितीत १३२/३३ के.व्ही. कुरुंदा, जिंतुर आणि २२०/३३ के.व्ही. लिंबाळा या उपकेंद्राव्दारे वीज पुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत कार्यान्वित असलेली १३२ के.व्ही. बसमत (जि. हिंगोली), आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) व अर्धापूर (जि.नांदेड) ही १३२ के.व्ही. उपकेन्द्रे १३२ के.व्ही. कुरुंदा उपकेन्द्राशी जोडलेली आहेत. त्यामुळे या १३२ के.व्ही. उपकेंन्द्रांना २२० के.व्ही. कुरुंदा उपकेन्द्रातून सक्षम वीज स्त्रोत उपलब्ध होईल व त्यामुळे १३२ के.व्ही. कुरुंदाशी जोडलेल्या उपकेन्द्रांना योग्य दाबाने वीज पुरवठा होईल व १३२ के.व्ही. हिंगोली - कुरुंदा वाहिनीवरील भार कमी होईल.
(५) प्रश्न उदभवत नाही.

गिरगाव व टेंभुर्णी (ता. वसमत जि.हिंगोली) मंडळातील दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत मिळण्याबाबत

(८) ३५८७० (१७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद), श्री.यशवंत माने (मोहोळ) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरगाव व टेंभुर्णी (ता. वसमत जि.हिंगोली) हे मंडळ सन २०१७-१८ मध्ये दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून अद्यापही या मंडळातील दुष्काळग्रस्तांना प्रत्यक्षात मदत मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्तांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. सन २०१८ च्या खरीप हंगामात केंद्र शासनाच्या "दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६" मधील निकषांनुसार दि. ३१.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला. सदर निकषांप्रमाणे हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला नाही. तथापि, दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त, इतर तालुक्यातील ज्या महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर २०१८ या कालावधीत तालुक्याच्या सरासरी पर्जन्याच्या ७५% पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाले आहे अशा २६८ महसुली मंडळामध्ये दि. ०६ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन

निर्णयान्वये दुष्काळ घोषित करून विविध ८ सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील गिरगाव व टेंभुर्णी या महसुली मंडळांचा समावेश आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) खरीप २०१८ च्या हंगामात दुष्काळ घोषित केलेल्या २६८ महसुली मंडळे व दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या ५४४९ गावांतील ३३% पेक्षा अधिक शेतीपिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्याच्या अनुषंगाने रु.२८५८.४०/- कोटी इतका निधी मिळावा याकरिता केंद्र शासनास दि. २१.११.२०१९ रोजी ज्ञापन पाठविण्यात आले होते. त्यावर दिनांक २१.११.२०१९ रोजीचे ज्ञापन "दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६" मधील बाबींची पूर्तता करत नसल्यामूळे, सदरचा प्रस्ताव अमान्य केला असल्याचे केंद्र शासनाच्या कृषी मंत्रालयाने दि. २५.०२.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील बाबींची पूर्तता करत नसल्यामूळे खरीप हंगाम २०१८ मध्ये राज्य शासनाने स्वत:हून दुष्काळ घोषित केलेल्या २६८ महसुली मंडळे व दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या ५४४९ गावांतील शेतकऱ्यांना ८ सवलतींव्यतिरिक्त शेतीपिकांच्या नुकसानासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून कोणतीही मदत अनुज्ञेय होत नाही. त्यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील गिरगाव व टेंभुर्णी या महसुली मंडळांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक न्याय विभागाच्या निधीचा यथायोग्य विनियोग होण्याचे दृष्टीने
अनुसूचित जाती उपयोजना कायदा करण्याबाबत

(९) ३६०२५ (१२-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संविधान फाऊंडेशन यासह अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या उन्नतीसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संघटनाच्या पदाधिकारी यांचे समवेत दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी सामाजिक न्याय मंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात (मुंबई) येथे बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांसाठी दरवर्षी अर्थसंकल्पीय तरतूदी अन्वये प्राप्त होणाऱ्या हजारो कोटी रूपये निधीचा विनियोग नियोजनबध्द करुन प्रत्येक गरजू लाभार्थ्यांला लाभ मिळावा यासाठी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व मुल्यमापन करता यावे यासाठी तेलंगणा राज्याच्या धर्तीवर बजेट अंमलबजावणीचा कायदा करण्यात येणार असल्याचे .सामाजिक न्याय मंत्री यांनी त्याच दिवशी प्रसार माध्यमांसमोर जाहीर केले असल्याचे दि. १२ ऑगस्ट २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नोक्त स्तंभ २ प्रकरणी कायदा करण्याबरोबरच युपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे मार्गदर्शन मिळावे यासाठी पुणे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (बार्टी) पंचतारांकित अभ्यास केंद्र उभारण्याचे देखील विचाराधीन असल्याचे सामाजिक न्याय मंत्री यांनी जाहीर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वाकरण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे अध्यक्षतेखाली दि.१२ ऑगस्ट, २०२१ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली होती.

(२), (३) व (४) होय, हे खरे आहे. आंध्रप्रदेश, कर्नाटक व ओरिसा या राज्याने सन २०१३ पासून अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनेचा कायदा केलेला आहे. सदरहू कायद्यांच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित

जाती उपयोजना कायदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच बार्टी संकुल, येरवडा येथे एकूण ७० उमेदवारांचे निवासी युपीएससी प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मनोर (जि.पालघर)येथील वारली हाट कामासाठी रू. ५७ कोटी ८५ लाख रकमेच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

(१०) ३६५८७ (१२-०१-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी लोककला व संस्कृतीचे दर्शन घडवत शेकडो लोकांना काम मिळवून देणाऱ्या दिल्लीच्या धर्तीवर उभारण्यात येणाऱ्या मनोर येथील वारली हाटसाठी शासनाने ५७ कोटी ८५ लाखांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यताही दिली असून आदिवासी विकास विभागाने ५० कोटींचा निधी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग करूनही गेल्या तीन वर्षांपासून काम संथ गतीने सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारली हाटच्या देखरेखीसाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून वारली हाट विकास समितीमार्फत निविदेची कार्यवाही करून रतन.जे. बाटलीबॉय कन्सल्टंट , मुंबई यांना या हाटच्या वास्तुविशारदपदी नियुक्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वारली हाटचे काम संथ गतीने करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२२-०६-२०२२) : (१) अंश:त खरे आहे.
मनोर येथील वारली हाट कामासाठी रू.५७.८५ कोटी रकमेच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त आहे.या प्रकल्पाचा निधी शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी,पालघर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत वारली हाट विकास समिती यांचे कडे वितरित करण्यात आलेला आहे. कोवीड काळात कामाची गती काही प्रमाणात मंदावली होती परंतु सद्यस्थितीत काम सुरू आहे.
प्रकल्प कार्यालय, जव्हार यांच्याकडुन सा.बां. विभागाच्या मागणीनुसार व वारली हाट समितीच्या शिफारसीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागास आतापर्यंत ९.१९ कोटी निधी वर्ग केलेला आहे व रू.४.२० कोटी निधीचा मागणी प्रस्ताव प्रकल्प कार्यालय,जव्हार यांना प्राप्त झालेला आहे.
(२) होय,हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

हिंगोली जिल्हयात माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टमुळे बाधित झालेल्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(११) ३८१७६ (३०-०३-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणात पिकांचे,घरांचे व व्यापा-यांचे नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात झालेल्या नुकसानीचा पंचनामे करण्यात आले आहेत काय,
(३) असल्यास, पंचनाम्यानुसार किती नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्यात आली आहे तसेच जिल्हयात झालेल्या नुकसानग्रस्तांसाठी शासनाने पॅकेज जाहिर केले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार (२०-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हिंगोली जिल्हयात माहे जून ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीत २९५९४६ हे. आर क्षेत्राचे शेंतीपिकांचे नुकसान झाले होते. सदर नुकसानीच्या अनुषंगाने रु.२८०१३.४३ लक्ष एवढा निधी हिंगोली जिल्हयास वितरित करण्यात आला असून सदरचा निधी बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि. ठाणे) येथील चींबीपाड्यातील आश्रमशाळेतील २८ विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण झाल्याबाबत

(१२) ३८३५९ (०९-०४-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि. ठाणे) येथील चींबीपाड्यातील आश्रमशाळेतील २८ विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण झाल्याचे विद्यार्थ्यांच्या पालकांना समजताच आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्याऐवजी पालक त्यांच्या मुलांना घरी घेऊन गेले, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना तातडीने कोणती वैद्यकीय मदत देण्यात आली तसेच आश्रम शाळेचे निर्जंतुकीकरण करुन या महामारीपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहे?

ॲड. के.सी. पाडवी (१५-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
दि.३/१/२०२२ रोजी चिंबीपाडा येथील शासकीय आश्रमशाळेतील २८ मुली व ५ मुलांना सर्दी खोकल्याचा त्रास जाणवत असल्याने त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, चिंबीपाडा येथे मुख्याध्यापक यांनी तपासणीसाठी घेऊन गेले असता १४ मुली व ४ मुले कोविड प्राथमिक तपासणीत (Antigen Test) पॉजिटिव्ह असल्याचे समजले. तथापि, कोरोना पॉजिटिव्ह विद्यार्थ्यामध्ये कोरानाची कोणतीही लक्षणे नव्हती. त्यानंतर सदरहू आश्रमशाळेतील उर्वरित विद्यार्थ्यांची कोविड एंटीजेन प्राथमिक तपासणी केली असता पुनश्च ९ मुली व १ मुलगा असे एकुण १० विद्यार्थी कोविड एंटीजेन तपासणीमध्ये पॉजिटिव्ह आढळले. ५ विद्यार्थी व २३ विद्यार्थीनी असे एकूण २८ जण कोविड पॉजिटिव्ह आढळून आले होते.
(२) व (३) चिंबीपाडा आश्रमशाळा परिसर निर्जंतुकीकरण करण्यात आला व एकूण २८ कोविड पॉजिटिव्ह विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना शाळा स्तरावर सुरु केलेल्या विलीगीकरण केंद्रात ठेवण्यात आले व उर्वरीत ५ विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांच्या मुलांना त्यांचे घरी विलगीकरणात ठेवणार असल्याचे लेखी दिले होते.
आश्रमशाळेतील कोविड पॉजिटिव्ह विद्यार्थ्यांना आरोग्य विभागाच्या प्रोटोकॉल प्रमाणे संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले व विद्यार्थ्यांना आवश्यक तो औषधोपचार करण्यात आला. विलगीकरण केंद्रासाठी २४ तास वैद्यकिय अधिकारी व परिचारीकांची नेमणुक करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विलगीकरणाचा कालावधी पुर्ण केल्यावर दिनांक १०/०१/२०२२ रोजी वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात देण्यात आले. विद्यार्थ्यांना पालकांच्या ताब्यात देताना विद्यार्थ्यांमध्ये कोविड आजाराची कोणतीही लक्षणे नसल्यामुळे विलगीकरण कक्ष बंद करण्यात आले व आश्रमशाळेचे नियमित निर्जंतुकीकरण करण्यात आले होते.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे ३४० जणांचा मृत्यु झाल्याबाबत

(१३) ३८८१६ (३१-०३-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या वर्षभरात राज्यात अतिरिक्त पाऊस, चक्रीवादळ, विजा, मेघगर्जना, पूर, दरड कोसळणे, गारपीट इत्यादी विविध नैसर्गिक आपत्तीमुळे सुमारे ३४० पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी हवामान विभागाने माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या सुमारास जाहिर केली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना कोणत्या स्वरुपाची व किती आर्थिक मदत देण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१२/ प्र.क्र.१५७/ म-३, दि.३०.१.२०१४ व शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१५/ प्र.क्र.४०/ म-३, दि.१३.५.२०१५ अन्वये नैसर्गिक आपत्तीमुळे घडलेल्या बाधित व्यक्तींचे वारसांना प्रत्येकी रु.४.०० लक्ष प्रमाणे मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

मालमत्तांची विक्री व लिलाव करण्यापूर्वी मालमत्तेच्या मालकांना
माहिती देणे सहकार आयुक्तांनी बंधनकारक केले असल्याबाबत

(१४) ३८९६२ (०९-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरकारी संस्थांकडून घेतलेल्या कर्जासाठी तारण म्हणून ठेवलेल्या मालमत्तेची विक्रीबाबत सहकारी संस्थांनी संबंधित कर्जदाराला किंवा मालमत्तेच्या मालकांना त्या मालमत्तांची विक्री किंवा लिलाव करण्यापूर्वी माहिती देणे सहकार आयुक्तांनी बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मालमत्तेची विक्री करण्यापूर्वी वाजवी मुल्यांकन काढण्यात यावे असेही निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत किती सहकारी संस्थांनी त्यांच्याकडून कर्ज घेतलेल्या कर्जदाराला मालमत्तेची विक्री करण्यापूर्वी बंधनकारक नियमान्वये माहिती देण्याची कार्यवाही केली हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, ज्या सहकारी संस्थांनी माहिती न देता मालमत्ता विक्री वा लिलाव करणाऱ्या संबंधित दोषीवर काय कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. . शामराव उर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील (१५-०६-२०२२) : (१) व २) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये सहकारी संस्थांकडून घेतलेल्या कर्जासाठी तारण म्हणून ठेवलेल्या मालमत्तेची विक्रीबाबत सहकारी संस्थांनी संबंधित कर्जदाराला किंवा मालमत्तेच्या मालकांना त्या मालमत्तांची विक्री किंवा लिलाव करण्यापूर्वी माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच मालमत्तेची विक्री करण्यापूर्वी वाजवी मुल्यांकन काढण्यात यावे याबाबतदेखील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १०७ मध्ये तरतूद आहे.

(३) व (४) सहकार आयुक्तांनी दि. २९.१२.२०२१ रोजीच्या परीपत्रकान्वये तारण मालमत्तांची विक्री किंवा लिलाव करण्यापुर्वी सहकारी संस्थांनी संबंधीत कर्जदाराला माहिती देणेबाबतच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार संबंधीत संस्थाच्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात येते. तथापि एखाद्या सहकारी संस्थेने संबंधीत कर्जदाराला माहिती न देता

मालमत्ता विक्री केली असेल आणि जर संबंधीत कर्जदाराला याबाबत हरकत असल्यास कर्जदारास सदर प्रक्रीयेविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४ अन्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे पुनरिक्षण अर्ज दाखल करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धारासूर (ता.गंगाखेड ,जि.परभणी) येथील गुप्तेश्वर मंदिराचा जिर्णोधार करण्याबाबत

(१५) ३९४८१ (२४-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धारासूर (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील गुप्तेश्वर मंदिर पुरातत्व विभागाकडे संरक्षित असून ते अत्यंत जीर्ण झाले असल्याने याच्या जिर्णोधार करण्यासाठीचा अहवाल पुरातत्व विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मंदिराच्या जिर्णोधाराकरीता निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.१५ डिसेंबर,२०२१ रोजी अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात उपसचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुरातत्व विभागाकडे प्रलंबित असलेल्या अहवालास प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित विलासराव देशमुख (११-०६-२०२२) : (१) प्रश्नाधीन मंदिराची जतन दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
अशा स्वरुपाचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.२८.१०.२०२० रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(४) प्रश्नाधीन मंदिराच्या अंदाजपत्रकास उच्चस्तर सचिव समितीची प्रशासकीय मान्यता घेण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

नागपूर येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व सुपरस्पेशालीटी रुग्णालय येथील अद्यावत यंत्र सामुग्री खरेदी करीता प्राप्त निधीचा विनियोग केला नसल्याबाबत

(१६) ३९६८८ (२४-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (मेडीकल) व सुपरस्पेशालीटी रुग्णालय येथील अद्यावत यंत्र सामुग्री खरेदी करीता निधी प्राप्त होवूनही रूग्णालया व्दारे खरेदी प्रक्रिया न राबविल्याने हाफकिन संस्थेकडील ३२ कोटी रुपयांचा निधी परत करण्याची वेळ आली दि. २१ जानेवारी ,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत रूग्णालयात योग्य उपचाराकरीता निधी व यंत्र सामुग्रीची आवश्यकता असतांना प्रशासनाच्या दूर्लक्षपणामुळे निधीचा योग्य वापर करू न शकणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित देशमुख (०७-०६-२०२२) :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ, मर्यादित मुंबई यांच्यामार्फत यंत्रखरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. परंतु निविदा प्रक्रियेमध्ये पुरवठादार कंपन्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. त्यामुळे यंत्र खरेदीचे नियोजन आखून पुन्हा खरेदी प्रक्रिया करण्याकरीता प्रयत्न सुरु आहेत.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती करीता पालकांच्या उत्पनाची मर्यादा ८ लक्ष रुपये करण्याबाबत

(१७) ३९७८१ (०९-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विद्यार्थी परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता गेले पाहिजे म्हणून परदेश शिष्यवृत्ती योजना २००५ पासून सुरु करण्यात आली असून या शिष्यवृत्ती योजनेसाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा ६ लक्ष रुपये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, शिक्षणशुल्क,परीक्षा शुल्क योजना सन २०१२-१३ पासून सुरु असून या योजनेसाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा २ लाख ५० हजार रुपये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३)असल्यास, व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता २००४ पासून दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, गेल्या १० वर्षात सामान्य नोकरदार वर्गाचा पगार वाढला असल्यामुळे त्यानुसार कितीतरी पटीने महागाई वाढली असुन मध्यमवर्गीय पालकांच्या मुलांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५)असल्यास, शिष्यवृत्ती करीता विद्यार्थी पात्र ठरण्यासाठी त्यांच्या पालकांच्या उत्पनाची मर्यादा वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड के.सी पाडवी. (१३-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) विविध लोकप्रतिनिधी तसेच संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या लाभाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्याबाबत विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित आहे.

जत (जि. सांगली) तालुक्यातील वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

(१८) ३९८८२ (१३-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि. सांगली) तालुका भौगोलिकदृष्ट्या मोठा असून जत व माडग्याळ येथे दोन ग्रामीण रुग्णालये आहेत, हे खरे आहे काय ,
(२)असल्यास, माडग्याळ येथे एकही वैद्यकीय अधिकारी नाही तसेच जत येथे वैद्यकीय अधिका-यांच्या बहूतांश जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ही बाब गंभीर असून यासंदर्भात शासनाने तातडीने चौकशी करुन येथील वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त जागा तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वाकरण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१६-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) ग्रामीण रुग्णालय माडग्याळ येथे ०३ तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना जिल्हा निवड समितीमार्फत नियुक्ती देण्यात आली होती. तथापि, सदर तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांनी माहे डिसेंबर, २०२१ अखेर पदांचे राजीनामे दिल्याने पदे रिक्त आहेत.ग्रामीण रुग्णालय, जत येथे ०३ तदर्थ वैद्यकीय अधिकारी जिल्हा निवड समितीमार्फत भरण्यात आलेले आहेत.
(३) सन २०२१ मध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) ची २०५१ पदांसाठी पदभरती राबविण्यात आली. त्यामध्ये १८२५ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिका देण्यास टाळाटाळ होत असल्याबाबत

(१९) ४००३४ (१३-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात माडग्याळ येथील एका गर्भवती महिलेची परिस्थिती गंभीर असतानाही येथील कर्मचाऱ्यांनी १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यास टाळटाळ केली असल्याचे दि.१७ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा आपत्कालीन गंभीर परिस्थितीत असलेल्या अनेक रुग्णांना रुग्णवाहिका देण्यास संबंधित कर्मचारी टाळाटाळ करीत असल्याने त्यांचेवर खातेनिहाय चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (३०-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
दि. १७ जानेवारी २०२२ रोजी ग्रामीण रुग्णालय माडग्याळ येथे अशी कोणतीही घटना घडलेली नाही. तसेच बीव्हीजी इंडिया लि. यांच्याकडील प्राप्त माहितीनुसार दि. १७ जानेवारी २०२२ रोजी व त्या सुमारास कोणताही कॉल आपत्कालीन नियंत्रण कक्षास प्राप्त झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील नायगाव मतदार संघातील शेतकरी कर्जाची मागणी बँकांकडून पूर्ण होत नसल्याबाबत

(२०) ४०१०६ (०९-०४-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील नायगाव मतदार संघात शेतक-यांनी कर्जासाठी वारंवार बँकेकडे मागणी करुनही ती पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय
(२) असल्यास, एका बँकेत ६ हजाराच्या आसपास खातेदार असल्यामुळे बँकेला शेतक-यांना कर्ज देणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासन स्तरावर बँकेच्या शाखा वाढविण्याच्या द्रष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील (१६-०६-२०२२) : (१) व (२) नाही.

(३) सद्यस्थितीत नायगांव विधानसभा मतदारसंघात बँकेच्या शाखा पुरेशा असून मांजरम व केदार वडगाव या गावांत शाखा मंजूरीच्या प्रस्तावांवर राज्य स्तरीय बँकर्स समितीमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेतक-यांना मिळणा-या कर्जाचे उत्पन्न वाढवून देण्याच्या प्रस्तावाबाबत

(२१) ४०१९५ (०९-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना विविध बँकामार्फत शेतीच्या पेरणी व मशागतीसाठी शासनाच्या वित्त विभागाने ठरवून दिलेल्या मानकानुसार (scale of finance) शेतक-यांना अल्पप्रमाणात हेक्टरी कर्ज दिले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या कर्जाची रक्कम कमी असल्याने शेतक-यांना यामध्ये पेरणी किंवा मशागत करणे शक्य होत नसल्याने खाजगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना मिळणा-या कर्जाचे मानक वाढवून देण्याच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील (१६-०६-२०२२) : (१) नाही.

(२) शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या पिकांच्या उत्पादनासाठी बॅंकांकडून कर्जपुरवठा केला जातो. सदर कर्जाचा दर निश्चित करताना, राज्यस्तरीय तांत्रिक समिती व जिल्हास्तरीय तांत्रिक समिती मार्फत निश्चित केलेला कर्जदर दिशादर्शक मानला जातो. तसेच शेतकऱ्यांना दिले जाणारे पीककर्ज हे संबंधित बॅंकेच्या कर्जदर धोरणानुसार निश्चित केलेल्या प्रतीहेक्टरी दराने पीकाखालील क्षेत्र विचारात घेऊन दिले जाते.

(३) शेतकऱ्यांना दिले जाणारे पीककर्ज हे, संबंधित पिकांचे प्रतिहेक्टरी उत्पन्न, उत्पादन क्षमता, बाजार मुल्य, मशागत खर्च, निविष्ठा इ. बाबी विचारात घेऊन देण्यात येते. यामध्ये दरवर्षी वाढ होत असल्याचे दिसून येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

समुदाय आरोग्य अधिकारी नियुक्तीमध्ये झालेला गैरव्यव्हार

(२२) ४०२०६ (२४-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यात २७ जिल्हा परिषदांतर्गत १८०० वर समुदाय आरोग्य अधिकारी या पदासाठी भरती प्रक्रिया जिल्हानिहाय झाली.असून यातून नियुक्ती देताना समांतर आरक्षणाशिवाय रिक्त नसलेल्या जागांसाठी जिल्ह्याबाहेरील उमेदवारांना नियुक्ती दिली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, . उक्त प्रकिया गुणवत्ते नुसार झाली नसल्याचा आरोप जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेचे राज्य सरचिटणीस श्री. अशोक जयसिंगपुरे यांनी शनिवारी पत्रपरिषदेतून केला आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास,यवतमाळ जिल्ह्यात १०३ जागांसाठी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची स्वतंत्र जाहिरात काढून पदभरती घेण्यात आली यामध्ये महिला, खेळाडू, अपंग, प्रकल्पग्रस्त व सर्वसाधारण संवर्ग असे आरक्षण ठेवण्यात आले असून १०३ पैकी ९३ जागांची निवड झाली.उर्वरित जागांबाबत आरोग्य अभियान विभागाकडे मार्गदर्शन मागविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यातील गुणवत्तेत आलेले उमेदवार प्रतीक्षेत असून आरक्षणातील जागा खुल्या झाल्या असल्याने त्या ठिकाणी जिल्ह्यातील पात्र उमेदवारांना संधी देणे अपेक्षित असताना त्याऐवजी ज्यांनी यवतमाळ जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडे अर्जच केला नाही,अशा इतर जिल्ह्यातील उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून असाच प्रकार

राज्यातील इतरही २७ जिल्ह्यात राबविण्यात आला असल्यामुळे गुणवत्तेत अधिक मार्क असुनही अनेक पात्र उमेदवार नियुक्तीपासून वंचित राहिले आहेत तसेच आरोग्य विभागातील पेपर फुटीप्रकरणात असलेले श्री.महेश बोटले यांचा या प्रकरणातही हात असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला,हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, यापकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. तानाजी सांवत (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दिनांक ०१.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार समुदाय आरोग्य अधिकारी यांना नियुक्ती देतांना समांतर व सामाजिक आरक्षणाचे अवलंबन करण्यात आलेले असून त्यानुसारच नियुक्ती देण्यात आलेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हयात रिक्त असलेल्या एकूण १०३ पदांपैकी १०० समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची ६ महिन्याच्या प्रशिक्षणासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.
(६) प्रश्न उदभवत नाही.

अकोला येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात पद भरती करणेबाबत

(२३) ४०३७९ (२४-०४-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि. अकोला) येथील सुपर स्पेशालीटी रुग्णालयाकरीता शासनाने आवश्यक पदे मंजूर केलेली असून प्रत्यक्षात सुमारे ५० टक्केच पदभरती करावी असे शासन आदेशीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे रुग्णालय बांधकाम व यंत्र सामुग्रीने परिपुर्ण असतांना केवळ मंजुर पदभरती अभावी रूग्णालय सुरू करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालय कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर रुग्णसेवा पुरविण्यासाठी सुरु करावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधीं सतत मागणी करीत आहेत , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालयात पदभरती करुन रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री अमित देशमुख (१७-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना (PMSSY-III) अंतर्गत अकोला, औरंगाबाद, लातूर आणि यवतमाळ या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत अतिविशेषोपचार रुग्णालय सुरू करण्याकरीता प्रथम टप्प्याकरीता आवश्यक ८८८ पदांची निर्मिती दि.०८.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. सदर ८८८ पदांमध्ये अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला करीता प्रथम टप्प्यातील २२३ पदांचा समावेश आहे. पदभरतीच्या अनुषंगाने वर्ग-अ व वर्ग-ब या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अतिविशेषोपचार विषयातील शिफारस प्राप्त प्राध्यापक-९, सहयोगी प्राध्यापक-१३ व सहायक प्राध्यापक-४१ उमेदवारांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच वर्ग-क तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गाची काही पदे भरण्यात आलेली असून उर्वरित पदे राज्यस्तरीय स्तरावर संचालनालयामार्फत स्पर्धापरिक्षेद्वारे तसेच पदोन्नतीने भरण्यात येत आहे. अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला या नवीन इमारतीचे हस्तांतरण CPWD यांच्याकडून अटी व शर्तिच्या अधिन राहून दि.३१.१२.२०२१ रोजी करण्यात आले आहे.

(३) होय हे खरे आहे.
(४) वरील (१) व (२) प्रश्नाच्या उत्तरात नमूद केल्यानुसार रुग्णालयात पदभरती बाबत कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडी सेविकांना पोषण आहाराची माहिती ऑनलाईन व इंग्रजी भाषेत भरण्याची सक्ती शिथिल करण्याबाबत

(२४) ४०६४९ (१२-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोषण आहार योजने अंतर्गत स्तनदा माता, गर्भवती महिला आणि अंगणवाड्यामध्ये ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पोषण आहार देण्याचे कार्य अंगणवाडी सेविका करीत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांना पोषण आहाराची माहिती 'पोषण ट्रॅकर'द्वारे ऑनलाईन व इंग्रजी भाषेत भरण्याची सक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे आदेश 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना' आयुक्तालयाकडून देण्यात आले आहे तथापि अंगणवाडी सेविकांना 'पोषण ट्रॅकर' चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, 'पोषण ट्रेकर' हे ऍ्प्लिकेशन वापरताना अनेक अडचणी येत असल्याच्या तक्रारी अंगणवाडी सेविका करीत असल्याने पोषण ट्रॅकर द्वारे माहिती भरण्याची अट शिथिल करण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, अट शिथिल न करण्याची करणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकुर (१५-०६-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
पोषण ट्रॅकर हे केंद्र शासनाने विकसीत केलेले सॉफ्टवेअर आहे. सर्व राज्यांमध्ये एकाच प्रकारचे पोषण ट्रॅकर सॉफ्टवेअरची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर सॉफ्टवेअर हे इंग्रजी भाषेत असून केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे पोषण ट्रॅकर सॉफ्टवेअरची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही,
केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पोषण अभियानात राबविण्यात येणा-या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच ICT-RTM (Information Communication Technology Enable Real Time Monitoring) या उपक्रमांतर्गत अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करण्यासाठी जिल्हास्तर व प्रकल्पस्तरावर तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनामार्फत नियुक्त कॉमन सर्व्हीस सेंटर (CSC) या एजन्सीकडून प्रकल्पस्तरावर अंगणवाडी सेविकांना पोषण ट्रॅकर चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
(४) व (५) पोषण ट्रॅकर हे सॉफ्टवेअर केंद्र शासनाकडून विकसित केले आहे. त्यामध्ये बदल करणे किंवा नवीन योजनांचा अंतर्भाव करणे या बाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे. पोषण ट्रॅकर हे सॉफ्टवेअर इंग्रजीमध्ये बनविण्यात आले आहे. सदर सॉफ्टवेअरमध्ये कोणती माहिती भरावी हे मराठी भाषेमध्ये नमुद करण्यात आलेले आहे. फक्त इंग्रजी भाषेत लाभार्थीचे नांव व वय, जन्मदिनांक या सारखे आकडे इंग्रजीत भरावयाचे आहे. तरी देखील अंगणवाडी सेविकांना पोषण ट्रॅकर सॉफ्टवेअर वापरताना येणाऱ्या अडचणी संदर्भात केंद्र शासनाकडे पोषण ट्रॅकर मध्ये सुधारणा करणेबाबत ऑनलाईन बैठका तसेच लेखी स्वरुपात पत्रव्यवहाराने पाठपूरावा करण्यात आलेला आहे. सदर पोषण ट्रॅकर सॉफ्टवेअरवर केंद्र शासनामार्फत काम सुरु आहे.

यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात अपंग नोंदणी प्रक्रियेत होत असलेला विलंब.

(२५) ४०७५८ (२४-०४-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील अपगांना योजनांचा लाभ मिळावा यासाठी होणारी अपंग नोंदणी प्रक्रिया आॅनलाईन झाल्यामुळे ग्रामीण भागातील अपंगांना शासकीय रुग्णालयात यावे लागते, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, नोंदणीसाठी मर्यादित कक्ष असल्याने दुपारी २ पर्यंतच्या वेळेत सर्वांची नोंदणी होत नसल्याने रांगेत उभे राहूनही काम न होता अर्ध्याअधिक व्यक्तीना परत जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोंदणीची वेळ सकाळी ९ ते दुपारी २वाजेपर्यंतअसल्यामुळे यवतमाळ जिल्हयातील उमरखेड, पुसद, वणी, झरी, महागाव, मारेगाव या तालुक्यातून येणाऱ्या अपंगांना वारंवार यावे लागेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित देशमुख (२८-०६-२०२२) : (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

(५) लागू नाही

राज्यातील गड किल्ले संवर्धनाबाबत

(२६) ४०८१० (१२-०४-२०२२). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गड – किल्ले संवर्धनासाठी दुर्ग संवर्धनात कार्यरत असणाऱ्या संस्था, संघटना, कार्यकर्त्यांसोबत मा. मुख्यमंत्री यांनी माहे मे,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान ऑनलाईन बैठक घेत गड – किल्ले संवर्धनाचा संकल्प केला तथापि या संकल्पनेतून स्थापन करण्यात आलेल्या मुख्यमंत्री संकल्प कक्षाचे काम बंद असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, बैठक घेऊन संकल्पकक्षाद्वारे कोणतीही उपाययोजना आणि आराखडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. मुख्यमंत्री संकल्प कक्षाद्वारे पहिल्या ६ किल्ल्यांची निवड केली असून त्यामध्ये शिवनेरी, राजगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, सुधागड, आणि तोरणा किल्ल्यांचा समवेश असून या सहा किल्ल्यांच्या संवर्धनासाठी एक मध्यवर्ती समिती तसेच निवडलेल्या प्रत्येक किल्ल्यासाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करून याच ६ किल्ल्यांच्या जतन आणि संवर्धनाचा आराखडा करण्याच्या सूचना मा. मुख्यमंत्र्यांनी दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त सहापैकी एकाही किल्ल्याची स्वतंत्र समिती अद्याप स्थापन झालेली नाही याची कारणे काय आहे,

(५) तसेच, समिती स्थापन करण्यासाठी व किल्ल्यांचा सविस्तर विकास आराखडा तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित देशमुख (१८-०६-२०२२) : (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

पहिल्या टप्प्यातील ६ किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटन व परिसर विकास करण्याच्या दृष्टीने लोकसहभाग वाढविण्यासाठी

सर्व दुर्ग संवर्धन संस्था व कार्यकर्ते यांची दुर्गनिहाय उपसमिती स्थापन करण्याच्या सुचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली आहे.
(४) व (५) दुर्ग निहाय उपसमिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. प्राथमित टप्प्यात राजगड, तोरणा व सुधागड या ३ किल्ल्यांच्या जतन दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार निविदा कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून त्यास मंजुरी प्राप्त होताच प्रत्यक्ष कामे सुरु होणार आहेत. तसेच भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारितील शिवनेरी, विजयदुर्ग व सिंधुदूर्ग ३ किल्ल्यांचे साईट मॅनेजमेंट प्लॅन तयार करण्यास भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाची मान्यता मिळाली असून त्याअनुषंगाने शिवनेरी विजयदुर्ग व सिंधुदूर्ग ३ किल्ल्यांकरिता तज्ञ वास्तुविशारदांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

वैद्यकिय यंत्र खरेदी प्रक्रिया हाफकिन महामंडळाने प्रलंबित ठेवल्याबाबत

(२७) ४०९०३ (१३-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रुग्णांची गरज लक्षात घेऊन वैद्यकीय यंत्र खरेदीसाठी ४४ कोटी रुपये हाफकिन महामंडळा कडे जमा करुन दीड ते दोन वर्षे होऊनही अद्यापपर्यंत यंत्राची खरेदीच झाली नसल्याचे माहे जानेवारी,२०२२ अखेर निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे गरीब रुग्णांना स्वखर्चाने बाहेरुन उपचार करुन घेतात हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य, वैद्यकीय शिक्षण याबरोबरच आदिवासी विकास ,महिला व बालविकास , शिक्षण विभाग तसेच शासकीय मंडळ यांना लागणारी औषधे व यंत्रसामग्री यासाठी हाफकिन महामंडळामध्ये खरेदी कक्ष स्थापन केला असून यंत्र व औषध खरेदी हाफकिन मंडाळाव्यतिरिक्त अन्यत्र करणार नाही असे निर्देश असल्याने मेडिकलने रोबोटिक यंत्र, एमआरआय व कॅथलॅबसाठी ४४ कोटी ६६ लाख रुपये हाफकिनमध्ये जमा केले असून यास दोन वर्षाचा कालावधी झाला असून आजतागायत मेडिकलच्या रुग्णांसाठी हाफकिनने यंत्रांची खरेदीच प्रलंबित ठेवली असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यंत्र खरेदीस विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यासह यंत्र खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित देशमुख (१८-०६-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) नागपूर येथील रुग्णालयाकरीता हाफकीन महामंडळ स्तरावर यंत्राची खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाकडे वीज भांडवल आणि अनुदान योजनेसाठी नाशिक जिल्ह्यात दाखल झालेली कर्ज प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(२८) ४०९५६ (०९-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागास प्रर्वगातील तरुण बेरोजगारांसाठी महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाकडे वीज भांडवल आणि अनुदान योजनेसाठी नाशिक जिल्ह्यात दाखल झालेली कर्ज प्रकरणे मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महामंडळातर्फे ५० टक्के अनुदान योजना, प्रशिक्षण योजना व वीज भांडवल योजना या महामंडळाकडून राबविल्या जातात असून योजनेसाठी दाखल अर्जाच्या तुलनेत मंजूर होणाऱ्या अर्जाचे प्रमाण कमी असतानाही दोन दोन वर्षे या प्रकरणास मंजुरी न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, राज्यभरातील किती प्रकरणे दोन वर्षाच्या कालावधी पूर्ण होऊन ही कर्ज देणे प्रलंबित आहेत,
(४)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रशिक्षण योजना व वीज भांडवाल योजनेला तात्काळ मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. धनंजय मुंडे (२०-०६-२०२२) : (१)ही बाब खरी नाही.
(२) अनुदान योजना व बीज भांडवल योजनेच्या प्रकरणांना मंजूरी देण्याचे अंतिम अधिकार संबंधित बँकांना आहेत. महामंडळाकडे प्राप्त होणा-या प्रकरणांची प्राथमिक स्वरुपाची तपासणी करुन सदर प्रकरणे पुढील कार्यवाहीसाठी संबंधित बँकांकडे सादर केली जातात व सदर प्रकरणांची पुढील छाननी करुन संबंधित बँकेकडून लाभार्थ्यांच्या नांवे कर्ज मंजूरीपत्र जिल्हा कार्यालयाकडे प्राप्त झाल्यावर महामंडळाच्या हिश्श्याची रक्कम संबंधित बँकेकडे अदा केल्यावर बँकेकडून संबंधित लाभार्थ्यांना कर्ज वितरणाची कार्यवाही केली जाते.
(३) नाशिक जिल्ह्यात सन २०१९-२० ते २०२०-२१ या कालावधीत अनुदान व बीज भांडवल योजनेअंतर्गत प्रकरणांचा तपशील पुढीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे :-
वर्ष कार्यालयास प्राप्त कर्ज प्रकरणे बँकेस शिफारस केलेली कर्ज प्रकरणे बँकेने मंजूर केलेली प्रकरणे बँकेत प्रलंबित कर्ज प्रकरणे

अनुदान योजना	११५	१०२	२४	७८
बीज भांडवल योजना	३२९	३२९	८२	२४७

सन २०१९-२० मध्ये अनुदान योजनेअंतर्गत प्राप्त एकूण ६६ प्रकरणांपैकी ४८ कर्ज प्रकरणे बँकेस शिफारस करण्यात आलेली असून उर्वरित १८ प्रकरणांपैकी जिल्हा कार्यालयाने १३ कर्ज प्रकरणे कागदपत्राअभावी रद्द करुन ५ कर्ज प्रकरणे पुढील वर्षात बँकेस शिफारस केलेली आहेत.
प्रशिक्षण योजना महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत सन २०१९-२० या कालावधीत राबविण्यात आलेली असून एकूण ७८९६ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
(४) व (५) अनुदान योजना व बीज भांडवल योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता बँकेत मंजूरीकरिता प्रलंबित असलेली कर्ज प्रकरणे त्वरित निकाली काढण्याकरिता जिल्हा कार्यालयामार्फत संबंधित बँकेशी पत्रव्यवहार करणे, जिल्हा अग्रणी बँक अधिका-यांच्या संपर्कात राहणे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होणा-या बैठकीत प्रलंबित कर्ज प्रकरणांची माहिती सादर करुन त्याचा पाठपुरावा करणे अश्याप्रकारे प्रयत्न केले जात आहेत.

देवगाव सहकारी साखर कारखान्याची शेत जमीन (धामणगाव रेल्वे , जि.अमरावती) शेतकऱ्यांना परत मिळण्याबाबत.

(२९) ४१००१ (०९-०४-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगाव (ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती) येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव बँक लिमिटेड मुंबई यांनी ताबा घेणारी नोटीस कारखान्याच्या जागेवर लावली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारखान्याने २२ शेतकऱ्यांची १०८ एकर शेतजमीन अधिग्रहन करण्यात आली होती परंतु शेतजमीन ज्या कारणासाठी अधिग्रहण केली होती ती बाब सध्या होत नसल्याने अधिग्रहन केलेली जमीन शेतकऱ्यांना परत करण्यात यावी असा नियम आहे हेही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदर प्रकरणी कारखाना बंद झाल्याने सन २०१६ च्या मूल्यांकनानुसार संबंधित शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला देणार आहेत किंवा शेत जमिनी परत करणार आहेत हेही खरे आहे काय,
(४)असल्यास, उक्त प्रकरणी कारखाना बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांजवळ उपजीविकेचे दुसरे साधन उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना इतर नोकरीत सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील (१७-०६-२०२२) :(१) होय, हे खरे आहे
(२) व (३) हे खरे नाही. २० शेतकऱ्याकडून एकूण ४३.०२ हे.जमीन तत्कालीन संचालक मंडळाने खरेदी केलेली आहे. संबंधित शेतकाऱ्यांकडून जमिनी कारखान्याने पूर्वीच खरेदी केल्या असल्याने शेतकऱ्यांना
शेत जमिनीचा मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर कारखाना १९९६ पासून बंद असून तद्नंतर दि. ०२.०५.२००२ रोजी अंतिम अवसायनात घेण्यात आला आहे व अवसायनाचे कामकाज सुरू आहे . सबब, शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही .
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना सौरउर्जा योजनेचा लाभ मिळण्याबाबत

(३०) ४१३६२ (१९-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने सन २०१९ पासून सौरऊर्जा योजना सुरु केली , हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांनी पिकांना पाणी देण्यासाठी २४ तास वीज मिळावी यासाठी सौरउर्जेची मागणी केलेली असून एकूण ९७ हजार शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सौरउर्जा योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नितीन राऊत (२०-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील शेतक-यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी कुसुम योजनेतील घटक “ब” अंतर्गत १,००,००० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

कुसुम योजनेंतर्गत गठीत सुकाणू समितीने दि.२ सप्टेंबर, २०२१ रोजी ३८०० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी मान्यता दिली. त्यानुसार दि.१४ सप्टेंबर,२०२१ रोजी शेतकरी लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यासाठी ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात आले. दि.२१.०४.२०२२ पर्यंत १,०३,९०७ अर्जाची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. संबंधित ७ पुरवठादारांनी २७५० नग सौर कृषी पंपांसाठी स्वीकृती दिली असून त्यापैकी २४६५ नग सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

तसेच कुसुम योजनांतर्गत गठीत सुकाणू समितीच्या दि.१० डिसेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत ५०००० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार एकूण १४ पुरवठादारांना ५०००० नग सौर कृषीपंपांसाठी कार्यादेश देण्याचे काम प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी भागांमध्ये अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे नसल्याबाबत

(३१) ४१३६७ (२४-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागांमध्ये अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य सुविधा नसून माता मुलांवर उपचार करण्यासाठी रुग्णालये उपलब्ध नाहीत तसेच डॉक्टर आरोग्य अधिकारी, नर्स, आया अशी अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकात्मिक बालविकास योजनेतील अधिकाऱ्याकडे दुर्गम भागात जाण्यास वाहने नसल्याने त्यांना दुर्गम भागात जात येत नाही तसेच दुर्गम भागात आदिवासी बालमृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले,
(४) असल्यास, त्याअनुषंगाने राज्यातील आदिवासी दुर्गम भागात आरोग्य सेवा उपलब्ध करण्याबाबत तसेच रुग्णालयात असलेली रिक्त पदे त्वरीत भरण्यासह येथील आरोग्य यंत्रणा बळकट करुन बालमृत्यू, मातामृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. राजेश टोपे (१८-०५-२०२२) : (१)राज्यातील आदिवासी भागातील गावामध्ये २०५४ उपकेंद्रे, ३७८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २८१ भरारी पथके तसेच उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय याद्वारे आदिवासी भागातील लोकांवर तसेच माता व मुलांवर उपचार करण्यात येतात.
नवसंजीवनी कार्यश्रेत्रामध्ये काही पदे रिक्त आहेत हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरुस्कृत योजना असून या योजनेसाठी प्राप्त होणारा निधी हा Sharing Pattern मध्ये प्राप्त होत असतो. केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल सेवा योजना मधील अधिका-यांसाठी स्वत:ची वाहने खरेदी करण्याचे २०१७-१८ पासुन बंद केलेले आहे. त्यानुसार वाहन भत्यासाठी प्रती प्रकल्प २०८००/- इतकी रक्कम प्राप्त होत असते. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात वाहन भाडे हे सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांना दिलेले असून त्यांनी प्रती प्रकल्प २०८००/- इतका निधी वितरीत केलेला आहे.
राज्यातील नवसंजीवनी कार्यश्रेत्रातील बाल मृत्यू (१ ते ५ वर्षे) चे प्रमाण सन २०१९-२०२० च्या तुलनेने कमी आहे व ते कमी कमी होत आहे.
(३) राज्यातील आदिवासी भागात आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच नवसंजीवनी कार्यक्षेत्रामध्ये रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही चालू आहे.
(४) आदिवासी व दुर्गम भागात आरोग्य यंत्रणा बळकट करून माता व बालमृत्यु कमी करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागामार्फत खालील उपाय योजना करण्यात येतात.
बाल आरोग्य संबंधी योजना (आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU), नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (NBSU), ग्राम बाल विकास केंद्र (VCDC), प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील बाल उपचार केंद्र (CTC), पोषण पुर्नवसन केंद्र (NRC), Mother Absolute Affection व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम
माता आरोग्य संबंधी योजना (जननी सुरक्षा योजना,जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम , मानव विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना व प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान
नवसंजिवनी योजना (मातृत्व अनुदान योजना, भरारी पथक योजना ,दाई बैठका योजना)
जिल्हा स्तरावर सर्व माता मृत्यु व बालमृत्यु यांचे अन्वेषण करण्यात येते.
एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बालमृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना केल्या जातात.
(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने व ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम व ताजा आहार देण्यात येतो.

(२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असुन हया योजने अंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो.
(३) तसेच अमृत आहार योजनेंतर्गत ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातुन ४ दिवस अंडी व शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांना १ अंडी देण्यात येतात.
(४) अमृत आहार योजने अंतर्गत गरोदर, स्तनदा माता यांच्यासाठी प्रति लाभार्थी एक वेळचा चौरस आहारासाठी खर्च रु ३५/- व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/केळी यासाठी प्रति लाभार्थी नियमित आहाराव्यतिरिक्त रु. ६/- खर्च करण्यात येतो.
(५) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहे. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये ३ वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य विभागामार्फत औषधेपचार करण्यात येतात.
(६) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुला व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन समुदाय आधारीत कार्यक्रम, रीअल टाईम मॉनिटरींग व जन आं◌ंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.
राज्यातील आदिवासी कार्यक्षेत्रामधील नवसंजीवनी योजनेअंतर्गत संवर्गनिहाय रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

अमरावती जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती मदत निधी प्राप्त न झाल्याबाबत

(३२) ४१५२४ (२८-०३-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती मदत निधी माहे मार्च २०२१ पासून अद्याप पर्यंत अप्राप्त आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातून वारंवार या निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने नैसर्गिक आपत्ती मदत निधी जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विजय वड्डेटीवार (२०-०६-२०२२) : (१) खरे नाही,
मार्च ते मे, २०२१ या कालावधीत गारपीट व अवेळी पाऊसामुळे झालेल्या नुकसानीकरिता शासन निर्णय दि.१८.०२.२०२१ अन्वये जिल्हाधिकारी अमरावती यांना रू.२६८४.६१ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तद्नंतर तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीकरिता शासन निर्णय, दि.२३.०६.२०२१ अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांना रू.२९१.२१ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. जुलै, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता अमरावती जिल्हयाकरिता रू.२८८५.७२ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तर ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीकरिता अमरावती जिल्हयाकरिता रू.१६८०९.२४ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भूविकास बँकेकडील शेतकऱ्यांच्या थकीत कर्जमाफीबाबत

(३३) ४१५२७ (०९-०४-२०२२). डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून सन २०१६ मध्ये अवसायानात निघालेल्या भूविकास बँकेकडील शेतकऱ्यांच्या थकीत कर्जास माफी देणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,बँकेकडून कर्ज घेणाऱ्या राज्यातील अंदाजे ३३ हजार थकबाकीदार शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास,मा.उपमुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट २०२१ मध्ये भुविकास बँकेकडील शेतकऱ्यांच्या थकित कर्जमाफीची घोषणा केली असून माहे जानेवारी २०२२ अखेर किती शेतकऱ्यांना याचा लाभ देण्यात आला,

(४)असल्यास, उर्वरित शेतकऱ्यांचे थकीत कर्जासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शामराव पाटील (१५-०६-२०२२) :(१) व (२) होय.

(३) व (४) मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) यांचे अध्यक्षतेखाली भुविकास बँक कर्मचाऱ्यांच्या थकीत देणीबाबत दि. १८ ऑगस्ट, २०२१ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये भुविकास बँकेच्या कर्जदार शेतकऱ्यांची कर्जे माफ करणे तसेच भुविकास बँकांच्या कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा करुन त्यापोटी भुविकास बँकांच्या सर्व मालमत्ता शासनाच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मंत्रीमंडळ प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला असून त्यानुषंगाने वित्त विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे पांगारी व कुरुंजी (ता.भोर, जि.पुणे) येथील आदिवासी आश्रमशाळांना मुदतवाढ मिळण्याबाबत

(३४) ४१५८५ (३१-०३-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पांगारी व कुरुंजी (ता.भोर, जि.पुणे) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळांना मुदतवाढ मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना दि. २५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने आदिवासी आश्रमशाळांना मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड.के.सी. पाडवी (१५-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून दिनांक २२/११/२०२१ व दिनांक २५/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्यात नव्याने बांधण्यात आलेल्या रुग्णालयांबाबत

(३५) ४२०७१ (१२-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ठाणे व पालघर जिल्ह्यात तसेच इतर जिल्ह्यात किती रुग्णालये बांधण्यात आली आहेत,

(२)असल्यास,सदर रुग्णालयाच्या दुरुस्ती व नविन बांधकामाकरीता किती रक्कम खर्च करण्यात आली आहे,
(३)असल्यास,अद्यापपर्यंत किती रुणालयाची बांधकामे अपुर्ण आहेत व किती रुग्णालयांची बांधकामे पुर्ण झाली आहेत ?

श्री.राजेश टोपे (१५-०६-२०२२) : (१) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ठाणे जिल्हयात १, पालघर जिल्हयात १ व उर्वीरत राज्यामध्ये २० रुग्णालयाची कामे मंजूर झालेली आहेत.
(२) सदर रुग्णालयाच्या बांधकामाकरीता रु. ९५.३७ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.
(३) मंजूर झालेल्या २२ रुग्णालयापैकी १२ रुग्णालयाची कामे पूर्ण झाली असून १० रुग्णालयाची कामे प्रगतीपथावर आहेत.

महाराष्ट्र वैद्यकिय शिक्षण संघटनेच्या शिष्टमंडळांनी केलेल्या मागण्या

(३६) ४२२६९ (२४-०४-२०२२). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र वैद्यकिय शिक्षण संघटनेचे शिष्टमंडळ त्यांच्या न्यायिक मागण्या संदर्भात निवेदन व चर्चा करण्यासाठी सचिव,वैद्यकिय शिक्षण विभाग यांच्याकडे दिनांक ३ फेब्रुवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास गेले असल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावेळी संघटनेच्या सदस्यांच्या शिष्टमंडळास अपमानित करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना योद्धा म्हणून शासनाने गौरव केलेल्या डॉक्टरांना बडतर्फ करण्याची धमकी दिल्यामुळे संघटनेच्या सदस्यांननी जाहीर निषेध केला असल्याचे देखिल निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार संबधितावर कारवाई करणेसह वैद्यकिय शिक्षण संघटनेचे शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?.

श्री. अमित देशमुख (१८-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे,
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कोरोनाच्या आरटीपीसीआर अहवालात गैरप्रकार झाल्याबाबत.

(३७) ४२३९० (२४-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कोरोनाच्या आरटीपीसीआर अहवालात गैरप्रकार झाल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने दोन कर्मचा-यांना दोषी ठरवले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोषी आढळलेल्या दोघांनीही गुन्हयांची कबुली दिली आहे, हे ही खरे आहं काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार दोघाविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित देशमुख (१८-०६-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) चौकशीत दोषी आढळून आलेल्या दोन कंत्राटी कर्मचा-यांच्या विरुध्द जिल्हापेठ पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव प्रशासनाने या कर्मचा-यांच्या सेवा समाप्त केल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवा निवृतीचा लाभ एकरकमी मिळण्याबाबत.

(३८) ४२५५९ (१२-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयात गेल्या सात ते आठ वर्षापासून बऱ्याच सेवा निवृत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवा निवृतीच्या वेळी मिळणारी एकरकमी लाभ मिळालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास ,सदर सेविका व मदतनीस यांचा सेवानिवृती लाभाचे प्रस्ताव जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावरून ऑनलाईन पध्दतीने शासनास सादर करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अंगणवाडी सेविका व मदतनीस कमी मानधनावर काम करत असुन त्यांना शासनाची निवृत्तीवेतन ही मिळत नसल्यामुळे सेवानिवृती नंतर मिळणार एक रकमी लाभ तातडीने देणे बाबतची मागणी महिला व बालकल्याण मंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधी यांनी दि. ४ जानेवारी,२०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील अंगणवाडी सेविकांना सेवा निवृतीच्या वेळी मिळणार एकर कमी लाभ त्वरीत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकुर (२२-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती / मुत्यू / राजीनामा/ सेवेतून काढून टाकणे या प्रकरणी LIC मार्फत एकरकमी लाभ देण्याची योजना आहे. सदर योजनेतंर्गत बीड जिल्हयात १३६ अंगणवाडी कर्मचा-यांना एकरकमी लाभ मिळालेला आहे. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे एकरकमी लाभाचे प्रस्ताव निधीअभावी प्रलंबित होते. सदर प्रस्ताव निकाली काढण्याकरिता शासन निर्णय दिनांक ३०.०३.२०२२ अन्वये LIC ला रु.१०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदन योजनेचा प्रचार व प्रसार करण्याबाबत

(३९) ४३०३० (२४-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री. संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहरी व ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील गरोदर मातांना पुरेसा पोषण आहार मिळावा आणि किमान उपचारासाठी मदत व्हावी या उद्देशाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरोदर माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा माता यांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी केंद्र शासनाच्यावतीने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे अनुदान त्यांचे खात्यावर जमा केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रसुती अगोदर व प्रसुतीनंतर पहिल्या जिवंत बाळाकरीता मातेस विश्रांती मिळण्याकरीता बुडीत मजुरीचा लाभ देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश असून या योजनेअंतर्गत टप्प्याटप्प्याने पाच हजार रुपये गरोदर माता व स्तनदा मातांच्यापहिल्याजिवंतअपत्यासाठी गरोदर व स्तनदा मातांच्या खात्यावर थेट जमा करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेअंतर्गत सन २०२०-२०२१ व २०२१-२२ या वर्षात पुणे जिल्हयासह राज्यातील किती गरोदर मातांनी लाभ घेतला आहे तसेच या योजनेचा प्रचार व प्रसार कशा पध्दतीने करण्यात येत आहे ?

श्री. राजेश टोपे (०१-०७-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पहिल्या खेपेच्या गरोदर माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा माता यांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे अनुदान त्यांच्या खात्यावर जमा केले जातात.
(४) या योजनेअतंर्गत सन २०२०-२०२१ व २०२१-२२ या वर्षात पुणे जिल्हयात व महाराष्ट्र राज्यात लाभ घेतलेल्या लाभार्थीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

सन	२०२०-२०२१	२०२१-२०२२
पुणे	४७१४६	४७३०६
महाराष्ट्र	५३४१२८	५२१११३

सदर योजनेचा प्रचार-प्रसार बॅनर, पोस्टर, आईसी, डिजीटल वॉल पेन्टींग, टी.व्ही. स्क्रोल, सप्ताह-पंधरवाडा साजरा करुन, वृत्तपत्रामध्ये बातम्या, दूरदर्श मालिकांद्वारे (रयतेचा दरबार) करण्यात येतो.

राज्यातील अंगणवाडी कार्यकर्ती प्रशिक्षण केंद्र व मध्यमस्तर प्रशिक्षण केंद्रा मधील कर्मचा-यांचे प्रलंबित वेतन मिळण्याबाबत

(४०) ४३०३२ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे ३० अंगणवाडी कार्यकर्ती परिक्षा केंद्र (AWTC) आणि ५ मध्यमस्तर प्रशिक्षण केंद्र (MLTC) कार्यरत असुन ती स्वायत्त (NGO) संस्थेतर्फे चालविली जात असून यातील काही प्रशिक्षण केंद्रे ही सन १९८४ पासुन सुरु असून सदर केंद्र ही अंगणवाडी सेविका ,मदतनिस आणि पर्यवेक्षिका यांना पायाभुत व उजळणी प्रशिक्षण देऊन शासनाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे शिकवत असून सदर प्रशिक्षण केंद्रासाठी केंद्र शासनाचे ६०% व राज्य शासनाचे ४० % अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित प्रीशिक्षण केंद्रांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षांचे फक्त १० महिन्यांत अनुदान वितरीत केले असून त्या वर्षातील व त्यापुढील वर्षातील आगंणवाडी कार्यकर्ती परिक्षा केंद्र आणि मध्यमस्तर प्रशिक्षण केंद्राचे अनुदान रक्कम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाकडून सन २०१८-१९ या वर्षांत रक्कम रुपये १५४.४९ लक्ष एवढी रक्कम मंजुर केलेली असून सदर रक्कम राज्य शासनाने BDS वर उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अनुदान मिळाले नसल्याने सदरची अखर्चित रुपये १५४.४९ लक्ष एवढी रक्कम पुनर्वीनियोजन (Revalidation) करणे आवश्यक होते हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कर्मचारी सन २०१७-१८ पासून विना वेतन काम करीत असल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून त्यांच्यातील बरेच कर्मचा-यांचा विना वेतन तसेच कोरोनामुळे मृत्यू झाला असल्याने त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित झाल्याने राज्यातील उक्त प्रशिक्षण केंद्रांची सन- २०१७-१८ पासूनचे प्रलंबित अनुदान त्वरित अदा करण्याबाबत लोकप्रतिनीधी यांनी मा.महिला व बालविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २८ जुन,२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(५)असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकुर (१५-०६-२०२२) :(१),(२),(३),(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाचे ६० % व राज्य शासनाचे ४० % याप्रमाणे असे प्रशिक्षण केंद्रांना अनुदान दिले जात होते. सन २०१७-१८ मधील प्रशिक्षण केंद्राचे अनुदान केंद्र शासनाकडून उशिरा व कमी प्राप्त झाले होते. प्राप्त अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. सन २०१८-१९ मध्ये केंद्र शासनाकडून प्रशिक्षण केंद्राचे अनुदान रु.१५४.४९ लक्ष इतके प्राप्त झाले होते. सदर अनुदान आर्थिक वर्ष संपताना प्राप्त झाल्याने ते उपयोगात आणणे शक्य झाले नाही. त्यामुळे सन २०१८-१९ या वर्षातील प्रशिक्षण केंद्रांचे अनुदान प्रलंबित राहिले. तसेच केंद्र शासनाकडून सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षात अनुदान कमी प्रमाणात प्राप्त झाले होते. त्यामुळे २०१८-१९ मधील अनुदान रक्कम रुपये १५४.४९ लक्ष Revalidate करणे व सन २०१७-१८ व २०१८-१९ मधील प्रलंबित अनुदानासाठी केंद्र हिश्याखाली अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे. परंतु अद्याप केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यात कोरोना संसर्गाच्या काळात कुपोषित बालकांच्या प्रमाणात झालेली वाढ

(४१) ४३०४६ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गाच्या काळात अंगणवाडया बंद असल्यामुळे ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांच्या आरोग्य तपासण्या झाल्या नसल्यामुळे बीड जिल्ह्यात ५११ तीव्र कुपोषित बालके असून या मधील सर्वाधिक बालके अंबाजोगाई, बीड व शिरूर तालुक्यात निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केज मतदार संघातील अंबाजोगाई, केज, बीड सह जिल्ह्यात त्वरित शासन निर्देशानुसार बालकांची आरोग्य तपासणी व पोषण सुविधा उपलब्ध करून ठीक ठिकाणी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महिला व बालविकास मंत्री यांच्याकडे दि. १४ सप्टेबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकुर (१५-०६-२०२२) : (१) हे खरे आहे. दिनांक १५ ऑगस्ट २०२१ ते ३१ ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये केलेल्या आरोग्य तपासणीमध्ये ५११ तीव्र कुपोषित बालके निदर्शनास आली आहेत.

(२) व (३) हे खरे आहे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे.

अ) अमृत आहार योजने अंतर्गत गरोदर व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

ब) अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर व स्तनदा माता यांच्यासाठी प्रति लाभार्थी एक वेळचा चौरस आहारासाठी खर्च रु.३५/- व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/केळी यासाठीचा प्रति लाभार्थी नियमित आहाराव्यतिरिक्त रु.६/- इतका खर्च करण्यात येतो.

(३) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

(४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय

आधिारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रोजगार वाढविण्याबाबत

(४२) ४३०८६ (०९-०४-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०११-२०२० या वर्षात १९ लाख बेरोजगार रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर सस्टेनेबल एम्प्लॉयमेंट विभागाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, अहवालाच्य अनुषंगाने राज्यात रोजगार वाढविण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वाकरण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकुर (०६-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही. तथापि, या विभागातर्फे नोकरी इच्छुक /स्वयंरोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी खालीलप्रमाणे विविध योजना राबविण्यात येत आहेत.
१) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय मार्गदर्शन केंद्राचे संगणकीकरण.
२) बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सद्दश्य अभ्यासिका (लायब्ररी).
३) बेरोजगार उमेदवारांना तात्काळ नोक-या उपलब्ध करणेसाठी रोजगार मेळावे आयोजित करणे.
४) आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र.
५) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम.
६) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे.
७) उमेदवारांना ऑनलाईन समुपदेशन करणे.
८) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे.
९) मॉडेल करिअर सेंटर.
१०) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत कौशल्य प्रशिक्षणातून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी.
महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत विविध योजनांमधून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी.
११) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत विविध योजनांमधून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूरच्या शासकीय वैद्यकीय व रुग्णालयात कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत

(४३) ४३२८४ (१३-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्करोग पीडितांना अद्ययावत सोयी सुविधा मिळण्यासाठी सन २०१२ मध्ये तत्कालीन शासनाने नागपूर मेडिकल रुग्णालयात कर्करोग रुग्णालय उभारणीची घोषणा केली असून आजमितीस १० वर्षे लोटली तरी कर्करोग रुग्णालयाच्या बांधकामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सन २०१७ मध्ये दोन वर्षात कर्करोग रुग्णालय उभारण्याचे निर्देश न्यायालयाने शासनास दिले असतानाही आजतागायत सदरहू निर्देशाचे पालन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, नागपूरच्या वैद्यकीय रुग्णालयात कर्करोग रुग्णालय उभारणीच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे आणि सदरहू रुग्णालय कार्यान्वित होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे ;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित देशमुख (२८-०६-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे
(३) व (४) नागपूर येथील रेडिओथेरेपी विभागाच्या श्रेणीवर्धन व कर्करोगाची नवीन सोयी सुविधा निर्माण करण्याचे काम नागपूर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर यांना देण्यात आलेले असून सदर कामासाठी २४ महिन्यांचा कालावधी अपेक्षीत आहे. सद्यस्थितीत निविदा उघडून न्युनतम देकार असलेल्या कंत्राटदाराची तांत्रिक अर्हता तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

नागपूर जिल्हयातील वानाडोगरी क्रिडा संकुल परिसरात पथदिवे व विद्युत रोषणाई करिता मंजूरी मिळण्याबाबत

(४४) ४३६०४ (०९-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील वानाडोगरी क्रिडा संकुल परिसरात पथदिवे व विद्युत रोषणाई करिता (हायमॉस्ट) खनिज प्रतिष्ठान योजनेअंतर्गत ३९.७८ लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे सादर करुन्ही अद्याप मंजूरी दिल्या नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना दि. ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देण्यात आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रिडा संकुल सोलर लाईट संदर्भात पथदिवे व विद्युत रोषणाई करिता तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (२३-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्रिय खाण मंत्रालय यांच्या दि.२३.०४.२०२१ रोजीच्या आदेशानुसार नागपूर येथील जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत नियामक परिषद व कार्यकारी परिषदे मधील संरचनेत सुधारणा करण्याची कार्यवाही चालू असून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या संरचनेतील पुनर्रचनेनंतर निधी वितरणाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) सदर प्रश्न उद्भवत नाही.

मौजा नेरी (मानकर) (ता.हिंगणा,जि.नागपूर) येथे आंगणवाडीस स्वतंत्र इमारत बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

(४५) ४३६१२ (१२-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा नेरी (मानकर) (ता.हिंगणा,जि.नागपूर) येथे आंगणवाडीस स्वतंत्र इमारत नसल्यामुळे सद्य:स्थितीत अंगणवाडी समाज भवन इमारतीमध्ये सुरु असून स्वतंत्र इमारत बांधकामाबाबत माहिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद,. नागपूर यांना लेखी निवेदन देवूनही अद्याप स्वतंत्र इमारत बांधकामास मंजूरी देण्यात आली नसल्याचे, निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आंगणवाडी इमारत बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकुर (१५-०६-२०२२) :१), २) व ३) नेरी (मानकर), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील अंगणवाडी ही समाज मंदिरात भरत नसून सन २०१२-१३ मध्ये स्वतंत्र इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून इमारत चांगल्या स्थितीत असून सद्यस्थितीत अंगणवाडी या इमारतीमध्ये भरत आहे.

तथापि, नेरी (मानकर), ग्राम पंचायत अंतर्गत मौजा तुरागोंदी येथे मिनी अंगणवाडी कार्यरत असून सदर मिनी अंगणवाडी समाज भवनामध्ये भरत आहे.

शासन निर्णय दिनांक ३१.१.२०२२ नुसार महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३ % इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यामध्ये अंगणवाडी केंद्रांचे इमारत बांधकामही समाविष्ट आहे.

राज्यातील महिला व बालविकास विभागातील जिल्हा परिविक्षा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना गट ब राजपत्रित पदाचा दर्जा देण्याबाबत

(४६) ४३६५१ (१३-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील महिला व बालविकास विभागातील जिल्हा परिविक्षा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना गट ब राजपत्रित पदाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधिन असून याबाबत मंत्री महिला व बालविकास व प्रधान सचिव, महिला व बालविकास यांचेकडे लोकप्रतिनिधी यांनी दि. ८ मार्च,२०२१ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जिल्हा परिविक्षा अधिकारी व तत्सम संवर्गातील एकूण ६१ पदे ही गट क मधील असुन ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीनुसान व ७ वा वेतन आयोगाच्या एस १६ स्तरामध्ये असून सदरील सर्व पदे राजपत्रित गट ब करण्याची संघटनेची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदरील बदल केल्यानंतर राज्य शासनावर अतिरिक्त कोणतीही भार पडणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्याम येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकुर (१७-०६-२०२२) : (१) व (२) होय

(३) व ४) शासनावर अतिरिक्त आर्थिक भार अपेक्षित नाही. तथापि,इतर अनुषंगिक मुद्दे तपासून पाहण्यास येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

महावितरणच्या नाशिक परिमंडळाचे प्रशासकीय कार्यालय वीजग्राहक ग-हाणे निवारण मंचाचे अध्यक्षपद रिक्त असल्याबाबत

(४७) ४३७१९(०९-०४-२०२२).डॉ.राहूल आहेर(चांदवड):सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज ग्राहकांच्या वीज सेवे विषयी असलेल्या तक्रारीचे निरासन करण्यासाठी महावितरणच्या राज्यभरातील सर्व परिमंडळ स्तरांवर वीजग्राहक ग-हाणे निवारण मंचाची स्थापना राज्य वीज नियामक आयोगाने केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणच्या नाशिक परिमंडळाचे प्रशासकीय कार्यालय असलेल्या नाशिक रोड येथील विदयुत भवनात वीजग्राहक ग-हाणे निवारण मंचाचे अध्यक्षपद वर्षभरापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने वीजग्राहक ग-हाणे निवारण मंचाला अध्यक्ष नियुक्त करून ग्राहकांना दिलासा देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वीज ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाच्या अध्यक्ष व सदस्य यांच्या निवड प्रक्रिये साठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा मार्फत दि. 25.11.2020 रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदभरती प्रक्रियेमध्ये नाशिक परिमंडळा करीता अध्यक्ष पदाचा सुयोग्य उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे नाशिक परिमंडळातील वीज ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे अध्यक्ष पद रिक्त ठेवण्यात आलेले होते.

तथापि, अध्यक्ष, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, नाशिक परिमंडळ यांचा अतिरिक्त कार्यभार अध्यक्ष, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. सर्व परिमंडळांतर्गत येत असलेल्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचातील रिक्त पदांचा आढावा घेवून पुढील पदभरती करण्यासंदर्भात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा मार्फत कार्यवाही सुरू आहे.

(४) लागू नाही.

कोपरगांव (जि.अहमदनगर) येथे बिबट्यांसाठी पिंजरे लावण्याबाबत

(४८) ४४४१८ (१८-०४-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) विधानसभा मतदारसंघात बिबट्यांचा संचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना शेतीला पाणी देण्याकरिता रात्री-अपरात्री शेतात जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिबट्याच्या हल्ल्यात कित्येक शेतकरी गंभीर स्वरुपात जखमी झाले असून सदरहू बिबटयांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागामार्फत पिंजरे तात्काळ लावण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उध्द्व ठाकरे (२७-०६-२०२२) : (१) कोपरगाव, जि. अहमदनगर भागात ऊसाच्या शेतीमुळे बिबट्यास कायमस्वरुपी लपण्याच्या जागा व पाण्याची सोय व उघड्या गोठ्यांमुळे सहज उपलब्ध होणारे भक्ष्य मिळाल्यामुळे बिबट्याने उसाची शेती असलेल्या भागात त्याचा अधिवास तयार केला आहे. अशा परिसरात बिबट्याने पाळीव प्राण्यांवर व मनुष्यांवर देखील हल्ले केल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२) होय हे खरे आहे.

(३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसास अथवा जखमी व्यक्तीस तसेच शेतपिक नुकसानीच्या तसेच पशुधन हानीच्या प्रकरणांमध्ये संबंधितास प्रचलित शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार आर्थिक सहाय्य अदा करण्यात येते. त्याकरीता क्षेत्रीय स्तरावर ऊणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (क) मधील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मानवी जिवितास धोकादायक असलेल्या वन्यप्राण्यास आवश्यकतेनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही देखील करण्यात येते.

बिबट्यांचा लोकवस्तीजवळ वावर कमी करण्यासाठी तसेच मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राजवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी तसेच भक्ष्य उपलब्ध व्हावे याकरीता उपाययोजना करण्यात येतात.

• क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना ट्रॅन्क्वीलायझर गन / ब्लो पाईप, ट्रॅप कॅमेरा, पिंजरे इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात सन २०२०-२१ मध्ये झालेल्या महापूर व अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरातील बाधितांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत

(४९) ४४४७६ (२५-०३-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सन २०२० -२०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरात शेतकऱ्यांच्या शेतीसह अन्य प्रांपचिक वास्तू, व्यापारी, कुक्कुटपालन व्यवसाय, पॉलीहाऊस यासह विविध प्रकरणांमध्येकोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नुकसानग्रस्ताना नुकसानभरपाई मिळण्यासाठी निधीचा मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत मदत व पुनर्वसन विभाग, (आपत्ती व्यवस्थापन) यांचे कार्यालयाकडे सादर करण्यात आला असून देखील नुकसानग्रस्ताना अद्यापपर्यंत नुकसानभरपाई मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई मिळण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वड्डेटीवार (२०-०६-२०२२) : (१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सन २०२०-२१ मध्ये झालेल्या महापूर व अतिवृष्टीमुळे शेतीपिके, घर पडझड, पशुधन, मनुष्यहानी इत्यादीचे नुकसान झाले आहे.
(२) व (३) -सन २०२०-२१ मध्ये झालेल्या महापूर, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी अनुज्ञेय बाबींवर कोल्हापूर जिल्ह्यासाठीशासनाच्या विविध शासन निर्णयान्वये रु.५२१९९.२५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाकडून देण्यात येणारा समाजभूषण पुरस्कार देण्यात न आल्याबाबत..

(५०) ४४४७७ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीत शासनाकडून देण्यात येणारा समाजभूषण पुरस्कार देण्यात आला नसल्याचे माहे जाने २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास शासनाकडून देण्यात येणारा समाजभूषण हा मानाचा पुरस्कार देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाकडून सदरील पुरस्काराचे वितरण केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२२) : (१) होय, हे अंशत: खरे आहे. सन २०१९-२०२०, २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या वर्षांचे पुरस्कार देण्यात आले नाहीत.
कोवीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पाश्वभूमीमुळे तसेच महाराष्ट्र शासनाने कोवीड या संसर्गजन्य आजारा दरम्यान संपूर्ण राज्यात शासनाने निर्बध घातल्यामुळे सन २०१९-२० पासून अद्याप पर्यंत कोणताही पुरस्कार सोहळा आयोजित केलेला नाही.

(२) सन २०१९-२०,२०२०-२१ व सन २०२१-२२ तिन्ही वर्षाचे एकत्रित पुरस्कार यावर्षी देण्याच्या अनुषंगाने दिनांक ०३ मे, २०२२ रोजी महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई यांचेकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देण्यासाठी जाहिरीत प्रसिध्द करण्यात आली असून सदर जाहिरातीत दिनांक १५/०५/२०२२ पर्यंत अर्ज करण्याची अंतिम तारीख नमूद केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.